imma™

# Tarun Bharat

## Every state needs to play pivotal role in India's progress: Kamat

Date: 30-08-2009 | Edition: Goa | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 21 H: 13

Clip: 1 of 1

# देशाच्या विकासासाठी प्रत्येक राज्याची भूमिका महत्त्वाची

## मुख्यमंत्री कामत यांचे प्रतिपादन

▶ **पणजी / स. प.**

मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी काल हडफडे येथे गोवा व्यवस्थापन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आयोजित समृद्धी २००९ या वार्षिक राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन केले.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री कामत यांनी देशाच्या विकासाच्या नवीन धोरणाचे समर्थन करून देशाने विकासित राष्ट्र होण्याच्या आणि २०२० सालापर्यंत महाशक्ती होण्याच्या दिशेने मार्गक्रमण केले असून हे महत्त्वाचे उद्दिष्ट साधण्यासाठी या देशाच्या प्रत्येक राज्याने महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे, असे सांगितले. त्यांनी गोवा व्यवस्थापन संस्थेच्या विद्यार्थ्यांना देशाच्या विकासात योगदान देण्याचेही आवाहन केले.




**हडफडे : 'समृद्धी २००९' या वार्षिक राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री दिगंबर कामत. बाजूला गोवा व्यवस्थापन संस्थेचे संचालक पीटर डीलिमा.**

श्री. कामत पुढे म्हणाले, भारत देश २०२० पर्यंत महाशक्ती बनेल, देशाच्या विकास दर मागील तीन वर्षांपासून वाढत चालला आहे. विदेशी गुंतवणूक वाढत आहे. देशातील साधनबल, रोजगार, साक्षरता, व्यापार व इतर क्षेत्रातील टक्केवारी वाढत आहे.

भारत देश महाशक्ती होण्यासाठी या गोष्टी सकारात्मक आहे, असे ते म्हणाले.

गोव्यानेही विविध क्षेत्रात भरीव प्रगती केली असून साक्षरता व आरोग्य क्षेत्रातील गोव्याची प्रगती उल्लेखनीय आहे. गरजू लोकांच्या फायद्यासाठी सरकारने विविध योजना सुरू केलेल्या आहे. परंतु प्रगती केलेल्या गोवा राज्याला केंद्राकडून पाहिजे तशी आर्थिक मदत मिळत नाही. हा गोव्यावर एक प्रकारे अन्याय असून ही गोष्ट मी नियोजन आयोगाच्या लक्षात आणून दिल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. गोवा व्यवस्थापन संस्थेचे संचालक पीटर डीलिमा यांनी स्वागतपर भाषणात संस्थेच्या कार्याची तसेच समृद्धी परिषद आयोजनामागची माहिती दिली.

या परिषदेचे प्रमुख वक्ते म्हणून अविष्कार इंडिया मायक्रो कॅपीटल फंडच्या गुंतवणूक मंडळाचे सदस्य श्री. अरूण दियाज, वात्सल्य हॅल्थ केअरचे डॉ. अश्विन नाईक, ओएजिसचे संस्थापक प्रदीप घोष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट बेंगळूरचे प्रमुख प्रो. त्रिलोचन शास्त्री यावेळी उपस्थित होते.